*पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने नागभीड येथील बसस्थानक बांधकामाला प्रशासकीय मान्यता*
*27 जुलै रोजी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता*
==========================================================================

अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड येथे नविन जागेत बस स्थानकाचे बांधकाम करण्यासाठी 4 कोटी 33 लक्ष 60 हजार 650 रु किंमतीच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दि. 27 जुलै 2019 रोजी नागभीड दौऱ्यावर असताना नगर परिषदेद्वारे आयोजित कार्यक्रमात नागरिकांना जाहीरपणे दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली आहे.

म. रा. मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक ( बांधकाम ) यांनी नागभीड येथे नविन जागेत बस स्थानकाचे बांधकाम करण्यासाठी 4 कोटी 33 लक्ष 60 हजार 650 रु किंमतीच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यामुळे या शहरात सर्व सुविधा युक्त बसस्थानकाच्या बांधकामाचा मार्ग सुकर झाला आहे व नागभीड वासीयांची प्रलंबित मागणी पूर्ण झाली आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने यापूर्वी चंद्रपूर , बल्लारपूर , मुल या शहरात अत्याधुनिक बसस्थानकांच्या बांधकामासाठी निधी मंजूर झाला आहे. यातील बल्लारपूर येथील बस स्थानक जनतेच्या सेवेत रुजू झाले असून चंद्रपूर व मुल येथील बस स्थानकांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.
नागभीड येथील बस स्थानकाच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल आ. किर्तीकुमार भांगडीया , नगर परिषद अध्यक्ष डॉ उमाजी हिरे , उपाध्यक्ष गणेश तर्वेकर, जि.प . सदस्य संजय गजपुरे आदींनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले आहे.